**शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल**

शिक्षक पात्रता परीक्षा (TET) विषयी मार्गदर्शन कार्यक्रम

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक ८ नोव्हेंबर २०२५ रोजी अंतर्गत गुणवत्ता निर्धारण (IQAC) कक्षा तर्फे **"शिक्षक पात्रता परीक्षा (TET) विषयक मार्गदर्शनपर विशेष कार्यक्रम"** अत्यंत उत्साहपूर्ण, प्रेरणादायी आणि शैक्षणिक वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट शिक्षक पदासाठी आवश्यक असलेल्या TET परीक्षेबाबत विद्यार्थी-शिक्षकांना आवश्यक मार्गदर्शन मिळावे, तसेच त्यांच्यामध्ये या परीक्षेबद्दल जागरूकता, आत्मविश्वास आणि प्रेरणा निर्माण करणे हे होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापक मा. प्रा. बिजली दडपे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सुयोग्य आयोजन आणि प्रभावी नियोजन मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय उत्कृष्ट पद्धतीने पार पाडण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. हे पूजन माननीय प्रमुख अतिथी तसेच सर्व प्राध्यापकवृंद यांच्या हस्ते अत्यंत भक्तीभावाने आणि मंगल वातावरणात संपन्न झाले. या पवित्र क्षणी ज्ञानदेवतेचे स्मरण करून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी मनोभावे प्रार्थना केली. यानंतर व्याख्यात्यांचे स्वागत महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापक मा. प्रा. बिजली दडपे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन अत्यंत आदरपूर्वक केले. त्यांच्या स्वागताने सभागृहातील वातावरण आणखी आनंददायी व उत्साही झाले.

यानंतर प्रास्ताविक सादर करताना मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार यांनी या कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख अतिथी **भाऊराव इदे सहाय्यक शिक्षक, अणुऊर्जा केंद्रीय विद्यालय, अणुशक्ती नगर** यांचे परिचय उपस्थितांसमोर करून दिले आणि कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्टपणे मांडले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात शिक्षक पात्रता परीक्षेचे शैक्षणिक महत्त्व अधोरेखित करत, शिक्षकांनी या परीक्षेद्वारे आत्मपरीक्षण करून आपल्या अध्यापन कौशल्यात सतत वृद्धी साधावी, अशी प्रेरक भावना व्यक्त केली. त्यांच्या भाषणातून शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता आणि जबाबदारीचे महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित झाले.

कार्यक्रमातील मुख्य आकर्षण म्हणजे तज्ञ व्याख्याते **श्री. भाऊराव इदे सहाय्यक शिक्षक, अणुऊर्जा केंद्रीय विद्यालय, अणुशक्ती नगर** यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन होय. त्यांनी TET परीक्षेची रचना, अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, अभ्यास करण्याच्या प्रभावी पद्धती, तसेच वेळ व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर अत्यंत सोप्या, सुबोध आणि प्रोत्साहनपर भाषेत मार्गदर्शन केले. त्यांच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना परीक्षेबाबत आत्मविश्वास, दिशा आणि व्यावहारिक दृष्टिकोन प्राप्त झाला. त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासामध्ये सातत्य, संयम आणि नियोजन या तीन घटकांचे महत्त्व पटवून दिले, जे त्यांच्या यशासाठी अत्यंत आवश्यक आहेत.

यानंतर अध्यक्षीय मनोगत माननीय प्रा. बिजली दडपे यांनी व्यक्त केले. त्यांनी IQAC कक्षाच्या या उपक्रमाचे व तज्ञ व्याख्यात्यांच्या मार्गदर्शनाचे मनःपूर्वक कौतुक केले. आपल्या प्रभावी शब्दांत त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेकडे केवळ पात्रता मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता, ती एक आत्मविकासाची आणि गुणवत्तापूर्ण अध्यापनाची संधी म्हणून पाहण्याचा सल्ला दिला. त्यांच्या विचारांमधून शिक्षणातील प्रामाणिकता, जबाबदारी आणि समर्पणाचा संदेश उमटला.

कार्यक्रमाच्या शेवटी आभारप्रदर्शन श्रीमती रुचिता सुतार यांनी केले. त्यांनी सर्व उपस्थित मान्यवर, प्रमुख अतिथी, प्राध्यापकवृंद, प्रशिक्षणार्थी छात्र-अध्यापक तसेच आयोजनात सहभागी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी विशेषतः IQAC कक्षाचे या यशस्वी आयोजनाबद्दल अभिनंदन केले आणि उपस्थित सर्वांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.रोहन भोईर यांनी केले.

### शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

### शिक्षक पात्रता परीक्षा (TET) विषयी मार्गदर्शन कार्यक्रम




कार्यक्रमांमध्ये दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजन करताना माननीय अतिथी आणि सर्व प्राध्यापक वृंद




माननीय प्रमुख अतिथी श्री. भाऊराव इदे यांचे स्वागत आणि सत्कार करताना मा. प्रा. बिजली दडपे




कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि अतिथी परिचय करताना मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार




शिक्षक पात्रता परीक्षा (TET) या विषयावर मार्गदर्शन करताना श्री. भाऊराव इदे




अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा. जेष्ठ प्राध्यापक बिजली दडपे




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना श्री रोहन भोईर




शिक्षक पात्रता परीक्षा (TET) मार्गदर्शन कार्यक्रमांमध्ये उपस्थित बी. एड्.प्रथम व द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी




शिक्षक पात्रता परीक्षा (TET) मार्गदर्शन कार्यक्रमाचे फलक लेखन



शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षा तर्फे शिक्षक पात्रता परीक्षा(TET) विषयी मार्गदर्शन कार्यक्रम.

कार्यक्रम पत्रिका.

| | |
|---|---|
| दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन | मा.प्राचार्य व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते |
| तज्ञ व्याख्यात्यांचे स्वागत | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले |
| प्रास्ताविक | डॉ. प्रियांका सुभेदार |
| तज्ञ व्याख्यात्यांचे मार्गदर्शन | श्री. भाऊराव इदे |
| अध्यक्षीय भाषण | मा.प्राचार्य डॉ. रमा भोसले |
| आभार प्रकटीकरण | श्रीमती.रुचिता सुतार |
| सूत्रसंचालन | श्री.रोहन भोईर |

दिनांक :-८ नोव्हेंबर २०२५
वेळ:- २:३०
स्थळ:- सरस्वती कक्ष



निमंत्रण पत्रिका
शासकीय अध्यापक महाविद्यालय,पनवेल.

सस्नेह निमंत्रण

मा. प्राचार्य, सर्व प्राध्यापक व प्रथम व द्वितीय वर्षाचे सर्व प्रशिक्षणार्थ्यांना सुचित करण्यात येते की, महाविद्यालयामध्ये शनिवार दिनांक ०८ नोव्हेंबर २०२५ रोजी अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षा तर्फे "शिक्षक पात्रता परीक्षा(TET) विषयी मार्गदर्शन" हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, तरी आपली सर्वांची उपस्थिती प्रार्थनीय आहे.

अध्यक्ष.
मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले

तज्ञ व्याख्याते.
मा. श्री भाऊराव इदे
(अणुऊर्जा केंद्रीय विद्यालय.अणुशक्ती नगर)

आयोजक .
डॉ.प्रियांका सुभेदार

प्रमुख उपस्थिती
प्रा.बिजली दडपे प्रा. डॉ.नीलिमा मोरे
प्रा.डॉ.उज्वला डोणे

दिनांक :-८ नोव्हेंबर २०२५ वेळ :- २:३०
स्थळ :- सरस्वती कक्ष

शिक्षक पात्रता परीक्षा (TET) मार्गदर्शन कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका आणि कार्यक्रम पत्रिका